N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** सासवड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0160 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/03/2023 02:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 13/10/2022
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/10/2022
**Time From (वेळेपासून):** 16:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/03/2023 **Time (वेळ):** 01:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/03/2023 01:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आनंद प्लाझा, रिलायन्स पेट्रोल पंपाशेजारी ,सासवड ता पुरंदर जि पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): क्रांती नामदेव पवार पोलीस उप अधीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1971

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अक्षय मारणे | | | 1. सासवड ता पुरंदर जि पुणे , सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | गणेश जगताप | | | 1. सासवड,ता पुरंदर जि पुणे, सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकारतर्फे फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिनांक 24/12/2021 रोजी पासून सहाय्यक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे.
दि.13/10/2022 रोजी आम्हांस श्री.श्रीहरी पाटील, पोलीस उपअधिक्षक -प्रशासन, अँटी करप्शन ब्युरो, पुणे यांनी, तक्रारदार श्री. दादासाहेब जगताप यांची लाचेविषयी तक्रार असून आपण तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन पुढील कारवाई करणेबाबत समक्ष कळवून तक्रारदार यांचा संपर्क क्रमांक दिला. त्याप्रमाणे आम्ही, तक्रारदार यांचेशी संपर्क करुन आम्ही,आमचे पथक व शासकिय पंचासह साई पॅलेस रेस्टॉरंट हिवरे रोड, सासवड येथे पोहोचलो. त्यावेळी तक्रारदार श्री जगताप यांची भेट घेतली त्यांनी त्यांचे नाव श्री. दादासाहेब गुलाबराव जगताप रा. सासवड, असे असल्याचे सांगीतले. सदरवेळी आम्ही तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारणा करता त्यांनी तक्रार थोडक्यात कथन केली व ती लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे,
" माझे सासवडला पुरंदर विदयापीठ कॉलेज असून सदर कॉलेजला काही माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी तक्रार केली आहे. सदर कार्यकर्ते मला ब्लॅकमेल करीत आहेत.
सदर बाबत सासवड पोलीस स्टेशन येथे तक्रार माझी घेत नाहीत व त्यासाठी पैसे मागतात. समक्षही पैसे घेत नाहीत. याबाबत मी सासवड पोलीस स्टेशन, डीवायएसपी सासवड एसपी सासवड यांना कळविले. तरी सदर प्रकरणी माझेवर खुप अन्याय झाला आहे. याबाबत मला माहिती आहे. सदर प्रकरणी आरटीआय कार्यकर्ते अजुन पुन्हा पुन्हा खंडणीची मागणी करीत आहेत.
सदर बाबत मी सासवड पोलीस स्टेशनला जुन 2021 पासुन संपर्कात आहे. दि. 13/9/2021 रोजी मी सासवड पोलीस स्टेशनला लेखी कळविले. दि. 23/9/2021 ला मी डीवायएसपी सासवड यांना कळवले. ऑक्टोबर 2021 मध्ये एसपी पुणे यांना कळवले. परंतु याबाबत दखल घेणेत आली नाही. जुन 2022 मध्ये मा. गृहसचिव पुणे यांचेकडूनही कार्यवाही करणेबाबत एसपी पुणे व त्यांनी सासवड पोलीस स्टेशन यांना कळविले. परंतु कोणतीही कार्यवाही झाली नाही.
याबाबत मी अनेक आमदार व खासदार यांना सदरबाबत सासवड पोलीस स्टेशनला याबाबत तक्रार दाखल करणेस सांगीतले. परंतु त्यांनी दखल घेतली नाही. वरती सासवड पोलीस स्टेशनरचे पीआय श्री घोलप साहेब सदर प्रकरणाची दखल घेणेऐवजी पुन्हा पैशाची मागणी करीत राहिले. आता फायनल त्यांनी 3 लाख रुपये दया नाहीतर माझेकडे येवू नका. मला बदलीसाठी पैसे हवे आहेत. श्री गणेश जगताप यांनी माझेसाठी अनेक वेळा माझेसमोर फोनवर घोलप साहेब यांचेशी बोलणे केले आहे. सदर रक्कमबाबत मला श्री गणेश जगताप यांनी फोनवरुन कळविले आहे. सदर रक्कम लाच आहे व मला याबाबत सदर रक्कम दयायची नाही. गणेश जगताप यांनी फोन करुन आम्हाला स्पीकर फोनवर ऐकवले आहे. मला सदर लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. तरी सदर बाबत कार्यवाही व्हावी ही विनंती."
वरील आशयाची लेखी तक्रार आम्ही वाचून त्या तक्रारीवर आम्ही सही केली. त्यानंतर ती तक्रार पंचाना वाचावयास देवून त्यावर पंचाच्या सहया घेतल्या.
त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच श्री झलके यांना सदर लाचेच्या तक्रारीच्या अनुषंगाने, लोकसेवक अण्णासाहेब घोलप पोलीस निरीक्षक सासवड हे खाजगी इसम गणेश जगताप यांचेमार्फत तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची खात्री करणेसाठी तक्रारदा श्री जगताप यांना सूचना देवून त्यांचेकडे व्हाईस रेकॉर्डर देवून पंच श्री झलके यांचेसोबत आनंद प्लाझा, सासवड पुणे रोड सासवड येथील गणेश जगताप यांचे कार्यालय येथे 15.20 वाजणेचे सुमारास पाठवुन पडताळणी केली असता तक्रारदार यांची खाजगी इसम श्री. गणेश जगताप यांचेशी भेट झाली. परंतु त्यावेळी लाच मागणी संबंधाने चर्चा झाली नाही.
दरम्यान तक्रारदार श्री जगताप यांना अक्षय मारणे याचा तक्रारदार यांचे मोबाईलवर फोन आल्याचे तक्रारदार यांनी सं ागीतले व सदर इसम हा गणेश जगताप यांचे ओळखीचा असून तो तक्रारदार यांचे सासवड पोलीस स्टेशनचे चे

काम करुन देण्यात मध्यस्थी करत आहे. तो साहेबांच्याकरीता पैसे देण्याची मागणी करीत आहे, त्यानेही भेटायला बोलावले असून, तो गणेश जगताप यांना भेटून बोलणार असल्याचे सांगीतले. त्यावर लोकसेवक अण्णासाहेब घोलप पोलीस निरीक्षक, सासवड हे खाजगी इसम गणेश जगताप व अक्षय मारणे यांचेमार्फत तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करीता तक्रारदार श्री जगताप यांना व्हाईस रेकॉर्डर बरोबर देवून पंच श्री.झलके यांचेसह श्री गणेश जगताप व अक्षय मारणे यांचेकडे चर्चेसाठी श्री गणेश जगताप यांचे कार्यालयात रवाना केले. तेथे तक्रारदार श्री जगताप, खाजगी इसम गणेश जगताप व अक्षय मारणे असे तिघांचेत कामा संदर्भाने चर्चा झाली. त्यावेळी अक्षय मारणे याने तक्रारदार यांचेकडे साहेबांच्या करीता तीन लाख रुपयांची मागणी केली. त्यानंतर थोडयावेळाने तक्रारदार पंचासह आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.

सायंकाळी 18.40 वाजणेचे सुमारास खाजगी इसम अक्षय मारणे याचा तक्रारदार यांचे मोबाईलवर मिस्डकॉल आला. त्यानंतर तक्रारदार यांनी अक्षय मारणे याचे मोबाईल क्रमांकावर फोन केला असता लाच मागणी संबंधीत त्यांच्यात पुन्हा चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्क्कम कमी करणेकरीता अक्षय मारणे याला विनंती केली. परतु त्याने 3 लाख दयावे लागतील मला कॅश ताब्यात दया, कॅश दिल्याशिवाय कुठलीच पोलीस यंत्रणा काम करणार नाही असे त्यानी सांगीतले.

आम्ही, तक्रारदार व पंच यांनी केलेले कथन व ध्वनीमुद्रीत संभाषण यावरुन तक्रारदार यांना सांगीतले की, आपण दिलेल्या तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये आपले काम करुन देण्याकरीता खाजगी इसम अक्षय मारणे हा लोकसेवक घोलप यांचेकरीता तीन लाख रुपये लाचेची मागणी करीत असल्याने खासगी इसम अक्षय मारणे याचेविरुध्द पुढील सापळा कारवाई करावयाची आहे. तरी आपण त्याचे मागणी प्रमाणे लाच रक्कम हजर करा असे सांगीतले असता, अक्षय मारणे याचे हातात लाच रक्कम देण्यास तक्रारदार श्री जगताप यांनी नकार दर्शविला व सापळा कारवाईची लाच रक्कम हजर केली नाही. त्यामुळे सापळा कारवाईचे आयोजन करता आलेले नाही. सदर बाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करणेत आला आहे.

सदर प्रकरणी अक्षय मारणे यांची लाच मागणी झाल्याचे निष्पन्न असल्याने तक्रारदार श्री जगताप यांना या प्रकरणी फिर्याद दाखल करणेसाठी वेळोवेळी कार्यालयात बोलाविले असता ते हजर राहिले नाहीत व फिर्याद देणेस टाळाटाळ करुन असमर्थता दर्शविली.

तरी, तक्रारदार श्री दादासाहेब गुलाबराव जगताप यांनी दिनांक 13/10/2022 रोजी लाच मागणी संबंधाने दिलेली मुळ तक्रार, त्या तक्रारीचे अनुषगाने शासकिय पंचासमक्ष दिनांक 13/10/2022 रोजी केलेली पडताळणी कारवाई त्यावेळी प्रत्यक्ष व ध्वनिमुद्रित झालेले संभाषण तसेच पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटना यावरुन खाजगी ईसम अक्षय मारणे रा. सासवड यांनी ,तक्रारदार श्री दादासाहेब जगताप यांनी सासवड पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारी अर्जावरुन गुन्हा दाखल करणेसाठी सासवड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अण्णासाहेब घोलप यांचेकरिता दिनांक 13/10/2022 रोजी 16.45 ते 19.04 वा. दरम्यान आनंद प्लाझा, सासवड येथे गणेश जगताप यांचे कार्यालयात 3,00,000/-रु (तीन लाख)लाचेची मागणी केली . अक्षय मारणे याने केलेल्या लाच मागणीस गणेश जगताप रा. सासवड यांनी सहाय्य केले. म्हणुन माझी (1)अक्षय मारणे ,(2) गणेश जगताप दोन्ही रा. सासवड यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 सुधारणा 2018 चे कलम 7अ,12 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

दाखल अमंलदार - म.सहा.फौज राणे

तपासी अमंलदार श्री संदिप व-हाडे पोलीस निरीक्षक लाप्रवि पुणे

भेट देणारे अधिकारी श्रीमती क्रांती पवार पोलीस उप अधीक्षक लाप्रवि पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

annasaheb balasaheb gholap(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

KranthiPawar

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

प्रभारी अधिकारी असलदार सासवड पोलीस स्टेशन

**Name** (नाव): annasaheb balasahe

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):